# आकाशवाणी नागपूर,
# (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# मंगळवार, दिनांक २८ मे २०२४

## ठळक बातम्या

1. **सहा लक्ष रुपयांचं बक्षीस असलेल्या जहाल नक्षल्याचं गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण.**
2. **स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र अभिवादन.**
3. **पुणे कार अपघात प्रकरणी ससून रूग्णालयात झालेल्या गैरप्रकाराचा तपास करण्यासाठी त्रि-सदस्यीय चौकशी समिती स्थापन.**

**आणि**

4. **उद्या नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि अकोला इथं उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी.**

*****

नक्षल आत्मसमर्पण

छत्तीसगड राज्यातील विविध चकमकींमध्ये सहभागी राहिलेल्या एका जहाल नक्षल्यानं आज गडचिरोली इथं केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. गणेश गट्टा पुनेम असं आत्मसमर्पित नक्षल्याचं नाव असून, तो छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील बेच्चापाल इथला रहिवासी आहे. ३५ वर्षीय गणेश पुनेम हा २०१७ मध्ये छत्तीसगड राज्यातील भैरमगड भागातील नक्षल्यांच्या पुरवठा समितीत सहभागी झाला. २०१८ पर्यंत तो या समितीचा उपकमांडर होता. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२मध्ये तिम्मेनार इथं झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनानं त्याच्यावर ६ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. आज गणेश पुनेम यानं केंद्रीय राखीव दलाचे पोलिस उपमहानिरीक्षक जगदीश मीणा यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. त्यानंतर त्याला गडचिरोली जिल्हा पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आलं. याप्रसंगी केंद्रीय राखीव दलाचे उप कमांडंट नितीन कुमार उपस्थित होते. २०२२ पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त आज त्यांना सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वीर सावरकर यांना त्यांच्या जयंती निमित्त आदरांजली वाहिली आहे. मातृभूमीच्या सेवेसाठी आपलं जीवन समर्पित करणारे वीर सावरकर देशवासीयांसाठी नेहमीच प्रेरणास्थान राहतील असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी वीर सावरकर यांच्या जयंती निमित्त आज राजभवनात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. वीर सावरकर यांच्या देशभक्तीला, प्रेरणादायी विचार आणि तेजस्वी व्यक्तिमत्वाला नमन असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या शासकीय निवासस्थानी वीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केलं. मुंबईत मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. यावेळी मंत्रालयातले अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. नागपूर महानगरपालिका, नागपूरचे विभागीय आयुक्त कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात देखील आज जयंती साजरी करण्यात आली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त नागपुरात अभिवादनपर कार्यक्रमात आयोजिण्यात आले होते. नागपुरातील शंकर नगर चौक येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला कठाळे परिवार प्रतिष्ठान, स्वातंत्रविर सावरकर स्मारक समिती, धरमपेठ सामाजिक संस्था, चित्पावन ब्राह्मण संघ, ब्राह्मण सेवा संघ, धरमपेठ शाखा, यासह विविध सामाजिक संस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पावसाळा पूर्व बैठक

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आज राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची महत्वपूर्ण बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने अवकाळी पाऊस,

अतिवृष्टी आणि गारपीटीचे पंचनामे, मदत, मराठवाड्यातील दुष्काळ आणि येणारा पाऊस या वेगवेगळ्या संकटाना कशा पद्धतीने सामोरे जायचे या प्रमुख मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, "आपत्ती व्यवस्थापन, मान्सून पूर्व घ्यायची काळजी, जाहिरातीचे फलक, दरड कोसळण्याची ठिकाणे, मुंबईतील वस्त्या अशा वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झाली. पावसाळ्यात ज्या गावांचा संपर्क तुटतो अशा गावांमध्ये औषधे पुरवणे, पुरेसे अन्नधान्य पुरवणे तसेच कर्नाटक, तेलंगणा आणि मध्य प्रदेश मधून येणारे पाणी याबद्दल समन्वय ठेवणे या विषयावर चर्चा झाली. बदलत्या हवामानाची पूर्वकल्पना लोकांना वेळेत मिळण्यासाठी हवामान विभागाशी चर्चा झाली. त्याचप्रमाणे रस्त्यातील खड्डे बुजवणे, धोकादायक इमारतीमधील रहिवाशांना इतरत्र हलवणे अशा विषयांवर देखील चर्चा करण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. संकटांना तोंड देण्यासाठी राज्यातील सर्व यंत्रणा सज्ज असल्याचं ते म्हणाले. बैठकीला सैन्यदल, नेव्ही, एअरफोर्स, कोस्टगार्ड, एनडीआरएफ, एसडीआरएफचे अधिकारी उपस्थित होते.

प्राध्यापक प्रेमलाल पटेल

प्राध्यापक प्रेमलाल पटेल यांनी नुकतंच नागपूरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात VNIT चे संचालक म्हणून पदभार स्वीकारला आहे. सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सूरत इथल्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील हायड्रोलिक्स आणि जल संसाधनांचे प्राध्यापक पटेल हे हायड्रोलॉजिकल सिस्टीमशी संबंधित इंटरनॅशनल असोसिएशन फॉर हायड्रो-एनव्हायर्नमेंट इंजिनीअरिंग अँड रिसर्च (IAHR) च्या हवामान बदल कार्य गटाचे सदस्य आहेत. ते इंडियन सोसायटी फॉर हायड्रोलिक्स, इंडियन वॉटर रिसोर्सेस सोसायटी आणि इन्स्टिट्यूशन ऑफ सिव्हिल इंजिनिअर्स, इंडियाचे सदस्य आहेत. प्राध्यापक पटेल यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधनात उत्कृष्टतेची नवीन उंची गाठेल असा विश्वास VNIT तर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

पुस्तक विमोचन

वर्ध्याच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे सहाय्यक संपादक डॉक्टर अमित विश्वास यांनी लिहिलेल्या 'भूमंडलिकरण: मीडिया की आचारसंहिता' या पुस्तकाचं विमोचन नुकतंच राजस्थानच्या ब्रह्मकुमारी संस्थान इथं आयोजित राष्ट्रीय मीडिया महासंमेलनात करण्यात आलं. मध्य प्रदेशचे सार्वजनिक आरोग्य मंत्री सम्पतिया उइके आणि केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे ओएसडी आयएफएस डॉ.राजशेखर यांच्या हस्ते या पुस्तकाचं अनावरण करण्यात आलं. यावेळी लेखक डॉ.अमित विश्वास यांनी पुस्तकाविषयी चर्चा करताना सांगितलं की, पारंपरिक माध्यमांपासून ते नवीन समाज माध्यमांमध्येही खोट्या बातम्या आणि माहितीचा व्यवसाय फोफावत आहे. पत्रकारितेचा उच्च दर्जा राखण्यासाठी लेखनविषयक आचारसंहिता पाळावी लागते. यासाठी मीडिया कौन्सिलची स्थापना करून तिला अधिक कायदेविषयक अधिकार द्यावेत, सर्व माध्यम संस्थांचा त्यात समावेश करावा, असं मत डॉ.विश्वास यांनी यावेळी व्यक्त केलं.

पुणे कार अपघात

पुणे कार अपघात प्रकरणी ससून रूग्णालयात झालेल्या गैरप्रकारचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. डॉ.पल्लवी सापळे यांच्या नेतृत्वाखालील ही समिती संपूर्ण घटनेचा तपास करणार आहे. दरम्यान,या समितीवर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आक्षेप घेतला आहे. डॉ.सापळे यांची जेजे रुग्णालयातल्या सामान खरेदी-विक्रीप्रकरणात चौकशी सुरु असून, त्यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती स्थापन करणं मंजूर नसल्याचं दानवे यांनी ट्विट संदेशात म्हटलं आहे. दरम्यान,ससून रुग्णालयाबाबत सातत्याने तक्रारी येत असून,या रुग्णालयाच्या गेल्या पाच वर्षांच्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढण्याची मागणी, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी शासनाकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी सामाजिक संपर्क माध्यमावर एक पोस्ट केली आहे. रुग्णसेवेच्या दृष्टीने अतिशय महत्वाची असणारी शासकीय संस्था अशा प्रकारे संशयाच्या भोवऱ्यात

अडकणं चांगलं लक्षण नाही,म्हणूनच रुग्णालय प्रशासनाच्या एकंदर कामकाजाची समिक्षा होणं आवश्यक असल्याचं सुळे यांनी म्हटलं आहे.

नाना पटोले

राज्यात सध्या दुष्काळाचा प्रश्न गंभीर आहे तर दुसरीकडे दारू आणि ड्रग्जचे सेवन करुन सर्वसामान्य लोकांना गाडीखाली चिरडण्याचे प्रकार वाढत आहेत. पुण्याच्या अपघात प्रकरणाची चौकशी सीबीआय मार्फतच झाली पाहिजे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज केलेल्या वार्ताहर परिषदेत केली. प्रकरण हाताळण्या संदर्भात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी त्यांनी केली आहे.

मतमोजणी

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी 4 जून रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एम.आय.डी.सी. परिसर, पडोली इथं होणार आहे. या संदर्भात निवडणूक आयोगाच्या सुचनांबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी उमेदवार आणि राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना सूचना दिल्या आहेत. तसच मतमोजणी केंद्रात उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश राहणार असून याव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश देण्यात येणार नाही, असही जिल्हाधिका-यांनी सांगितलं. मतमोजणी प्रक्रियेसंदर्भात माहिती देण्यासाठी नियोजन सभागृह इथं राजकीय पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांच्यासह काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हवामान

विदर्भातील अकोला, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उद्या उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज देखील अकोला आणि चंद्रपूर इथं उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट तर अमरावती, वर्धा आणि नागपूर इथं येलो अलर्ट जारी करण्यात आला होता. विदर्भात उन्हाची तीव्रता कायम असून परवा

देखील चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. दरम्यान विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान मागील चोवीस तासांत चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी इथं ४७ अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं. नागपूर इथं 45.6°c इतक तर अमरावती आणि वर्धा इथं 45 अंश आणि चंद्रपूर इथं 44.8 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी काही तासात विदर्भाच्या नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान देखील राहू शकतं असा इशारा हवामान खात्याने दिला. विदर्भातील उष्णतेची लाट बघता नागरिकांनी घराच्या बाहेर पडताना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. उष्मा प्रतिबंधक उपाययोजना करण्याच्या सूचना हवामान खात्यानं नागरिकांना दिल्या असून प्रशासन देखील उष्णतेची लाट हाताळण्यासाठी सज्ज असल्याचं सांगण्यात आलं आहे.

******